**<u>पहा.</u>** 1. मा.प्रबंधक निरीक्षण–1,उच्च न्यायालय, अपील शाखा, मुंबई यांचे पत्र जा.क्र.B(Gen)-5601/57/2026,/612, Dated 20th April, 2026.

2. मा.प्रबंधक निरीक्षण–1,उच्च न्यायालय, अपील शाखा, मुंबई यांचे पत्र जा.क्र.B(Gen)-5601/57/2026/734, Dated 06th May, 2026.

---

# जिल्हा व सत्र न्यायालय, उस्मानाबाद.

## परिपत्रक

प्रमुख जिल्हा न्यायाधीश, उस्मानाबाद हे खालील प्रमाणे आदेश निर्गमीत करितात –

न्यायिक जिल्हा उस्मानाबाद आस्थापने अंतर्गत कार्यरत असणाऱ्या स्थानिक व तालुका न्यायालयातील बेलिफ व चतुर्थश्रेणी कर्मचारी यांना याव्दारे कळविण्यात येते की, जिल्हा न्यायालय, उस्मानाबाद या आस्थापनेवरील भविष्यात रिक्त होणारे 02 वाहनचालक या पदांकरीता शैक्षणिक व इतर आवश्यक अर्हता प्राप्त कर्मचाऱ्यांकडून विहीत नमुन्यात अर्ज मागविण्यात येत आहेत.

**<u>वाहनचालक या पदासाठीची अर्हता –</u>**

1 उमेदवाराची कमीत कमी तीन वर्षांची नियमित सेवा झालेली असावी.

2. उमेदवाराचे वय हे 25 वर्षापेक्षा कमी व 35 वर्षापेक्षा जास्त असू नये.

3. उमेदवार हा कमीत कमी इयत्ता सातवी मान्यताप्राप्त शाळेतून उत्तीर्ण झालेला असावा व त्यास मराठी भाषा बोलता येणे आवश्यक आहे.

4. उमेदवाराकडे मोटार वाहन अधिनियम, 1988 अंतर्गत जड वाहने किंवा मोटार कार चालविण्याचा प्रभावी चालक परवाना असणे आवश्यक आहे.

5. उमेदवारास मोटार वाहन चालविण्याचा जसे की, कार आणि किंवा अवजड वाहने चालविण्याचा 03 वर्षापेक्षा कमी अनुभव नसावा.

6. उमेदवाराचे चालक पदी स्वच्छ ड्रायव्हिंग रेकॉर्ड असणे आवश्यक आहे.

7. उमेदवारास मोटार वाहनाच्या देखभालीचे आणि सामान्य दुरुस्तीचे कार्य ज्ञान असणे आवश्यक आहे.

8. उमेदवाराची चांगली शरीरयष्टी आणि शहराच्या स्थलाकृतीचे ज्ञान असावे.

9. उमेदवाराचे चांगले नैतिक चारित्र असले पाहिजे.

उपरोक्त अर्हता धारण करणाऱ्या इच्छुक बेलिफ व चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांनी या कार्यालयाकडे शैक्षणिक व इतर अर्हता धारण करीत असल्याबाबतचे आवश्यक ते (वाहन परवाना, इतर तांत्रिक ज्ञान) प्रमाणपत्रांच्या साक्षांकित प्रतीसह सोबत जोडण्यात आलेल्या विहीत नमुन्यात आपले अर्ज संबंधीत कार्यालय प्रमुखामार्फत या कार्यालयाकडे **<u>दिनांक 19 जून, 2026 रोजी किंवा त्यापुर्वी सादर करावेत.</u>** त्यानंतर आलेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही.

सदरचे परिपत्रक बेलिफ व चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांच्या निदर्शनास आणून दयावे, तसेच, कार्यालयामार्फत अर्ज रवाना करताना अर्जातील कर्मचाऱ्यांनी दिलेली माहिती तपासून ती बरोबर असल्याचे प्रमाणपत्र कार्यालय प्रमुखांनी स्वतंत्ररित्या दयावे.

Abhishri D Dev
11/06/2026

जिल्हा न्यायालय, उस्मानाबाद. { } **(अभिश्री ज्ञा. देव)**
दिनांक – 11 जून, 2026. { } प्रमुख जिल्हा न्यायाधीश, उस्मानाबाद.

<u>जा.क्र.काव्यवि / प्रशा / 8464 / 2026</u>
दिनांक 11 जून, 2026

<u>याची एक प्रत माहितीस्तव आणि कार्यवाहीस्तव –</u>

1. जिल्हा न्यायाधीश–1, **उमरगा / भूम / परंडा / कळंब.**
2. न्यायाधीश, कौटूंबिक न्यायालय, **उस्मानाबाद.**
3. दिवाणी न्यायाधीश व.स्तर, **उस्मानाबाद / उमरगा / भूम / परंडा / कळंब / तुळजापूर.**
4. मुख्य न्यायदंडाधिकारी, **उस्मानाबाद.**
5. सचिव, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, कार्यालय, **उस्मानाबाद.**
6. दिवाणी न्यायाधीश क.स्तर, **लोहारा / वाशी.**
7. सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, **उमरगा / भूम / परंडा / कळंब / तुळजापूर.**

<u>याची एक प्रत : –</u>

1. सहाय्यक अधिक्षक (रो.वि.ले), जिल्हा न्यायालय,**उस्मानाबाद** यांना देवून सुचित करण्यात येते की, सदरचे परिपत्रक जिल्हा न्यायालयाचे आस्थापनेवरील सर्व बेलिफ व चतुर्थश्रेणी कर्मचारी यांचे निदर्शनास आणून दयावे.
2. कार्यालयीन आदेश संचिका.

# <u>अर्जाचा नमुना</u>

१) उमेदवाराचे नांव : ..............................................................................

२) पदनाम : ..................................

३) सध्या कार्यरत ठिकाण :.................................................................................

४) जन्मतारीख : / /

५) वय : ................. वर्ष

६) सेवानियुक्तीचा दिनांक : / /

७) शासकीय सेवेचा कालावधी : वर्ष महिना दिवस

८) शैक्षणिक अर्हता : ................................................................................
................................................................................

९) इतर अर्हता : ................................................................................

१०) वाहन परवाना प्रकार : हलके : अवजड :

११) वाहन परवाना प्राप्तीचा दिनांक : .......................................................................

१२) वाहन चालविण्याचा अनुभव : .......................................................................

१३) वाहन देखभाल / दुरुस्तीचे ज्ञान : .......................................................................

**( टीप : अनुक्रमांक ८ ते १३ बाबत आवश्यक त्या साक्षांकित प्रतींसह माहिती सादर करावी)**

( )

दिनांक :- / /२०२६ कर्मचाऱ्याचे पुर्ण नाव व सही

...................................................................................................................

**<u>प्र मा ण प त्र</u>**

( कार्यालय प्रमुखाने दयावयाचे )

प्रमाणित करण्यात येते की, अर्जदारानी अर्जात नमूद केलेली माहिती सेवा पुस्तकावरुन व जोडलेल्या कागदपत्रावरुन तपासणी केली असता बरोबर असल्याचे दिसून आले.

कार्यालय प्रमुखाची सही व पदनाम